हा सर्व थरातला असतो. त्याची नाट्य अभिरुची आणि जाण घडवलेली नसते. त्यामुळे सादरीकरणात आणि लेखनात दुर्बोध प्रायोगिकता टाळा.

लोककला आणि मराठी रंगभूमी यांचा आरंभीच्या काळात लक्षणीय संबंध होता. परंतु पुढे पाश्चात्य रंगभूमीवरील प्रवाहांचा शहरी रंगभूमीवर प्रभाव पडायला लागल्यावर लोककला आणि मराठी नाटक ह्यांचे संबंध दुरावू लागले. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र मराठी रंगभूमीचे लोककलांशी नातं जोडायचे प्रयत्न दिसतात. त्यातले काही जाणीवपूर्वक तर काही लोककला माध्यमातल्या मुक्तपणाच्या आणि संगीत नृत्याच्या आकर्षणातून झाले. त्याचा विस्तृत आढावा इथं घेणं शक्य नाही. लोककलांचा रंगमंचावर वापर हा स्पर्धांतील एकांकिकांत पहायला मिळतो. परंतु त्याचं स्वरुप ढोबळ असतं. जाणीवपूर्वक प्रयत्नांपेक्षा काहीतरी वेगळं दाखवायच्या प्रेरणेतून त्याचा वापर केला जातो. एकूणच लोककला आणि मराठी नाटक यांच्यातला दुरावा स्पष्ट जाणवतो.

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षक मंडळ या शासकीय नावानं अस्तित्वात असलेलं सेन्सॉर बोर्ड याच्या आवश्यकतेविषयी आणि स्वरुपाविषयी विचार होणं मला गरजेचं वाटतं. ब्रिटीश राजवटीनं त्यांची राजकीय गरज म्हणून निर्माण केलेलं हे सेन्सॉर बोर्ड आज आचार, विचार आणि उच्चार स्वातंत्र्याच्या युगात ब्रिटिशांचाच वारसा इमानेइतबारे त्याच बुरसटलेल्या पद्धतीनं चालवीत आहे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. आज सेन्सॉर बोर्डाच्या प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही नाटकाचा, एकांकिकेचा प्रयोग होऊ शकत नाही. परफॉर्मन्स लायसन्सशिवाय, जे पोलीसांकडून मिळवावं लागतं, त्यासाठी अडवणूक केली जाते. सौभद्र सारख्या नाटकाची सुद्धा प्रमाणपत्राकरता अडवणूक केली जाते. ज्या नाटकांचे अनेक वर्ष हजारोनी प्रयोग झालेले आहेत असं नाटकही आज कुणालाही सेन्सॉर बोर्डाच्या प्रमाणपत्राशिवाय करता येत नाही. आणि कित्येक वेळा प्रमाणपत्राचा क्रमांक दिला तर मूळ प्रमाणपत्राची प्रत मागितली जाते. या सगळ्याचा अर्थ उघड आहे.

आजच्या सेन्सॉर बोर्डाचं स्वरुप कसं आहे? १) प्रमाणपत्र देण्याचे अनेक निकष, हे कालबाह्य आणि कलाबाह्य आहेत. २) सेन्सॉर बोर्डानं सुचवलेली काटछाट पाहिली की अनेकदा सभासदांची कोणत्याही वाक्यातून लेखकाला अभिप्रेत नसलेला अश्लील अर्थ काढण्याची क्षमता पाहून मन थक्क होतं ३) सेन्सॉर बोर्डावरील काही सभासदांचा रंगभूमी आणि साहित्य याच्याशी काडीइतका संबंध नसतो.